**<u>सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.</u>**

**(एम. ए. कुलकर्णी यांचे समक्ष)**

**CNRNO.MHSN**070010402023

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १६९/२०२३</u>**

वादी – सिताराम जाधव वगैरे

विरुध्द

प्रतिवादीं – शिवाजी जाधव वगैरे

..........................................................................................................

वादींतर्फे विधिज्ञ – श्री. पी. ए. पाटील

प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. एस. एच. पाटोळे

..........................................................................................................

**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**.

मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादीचा दावा कलम १अ यात नमुद केलेल्या शेतमिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसम यांनी हरकत अडथळ करु नये तसेच दावा मिळकतीच्या उत्तरेकडील बांधाची मोडतोड करु नये, पिकाची नासधुस करु नये, झाडे तोडू नयेत, आणखीन जादा क्षेत्रात अतिक्रमण करु नये म्हणून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथनानुसार, अ– जिल्हा तुकडी सांगली

तालुका व पोटतुकडी कवठे महांकाळ पैकी मौजे इरळी येथील गट नं. ९१३ क्षेत्र १ हे. ६० आर., आकार १रु. ५० पैसे शेत मिळकत याची चतुःसिमा पूर्वेस– गट नं. ९१२/१२, पश्चिमेस– रस्ता व त्यापलीकडे गट नं. ९१२/१३, दक्षीणेस – गट नं. ९१२/१५, ९१२/१६, ९१२/१७, ९१२/१८ व उत्तरेस – गट नं. ९१२/११. यापुढे सदर मिळकतीस ''वादमिळकत'' असे संबोधले आहे.

**३.** वादीच्या अर्जातील कथनानुसार वाद मिळकत ही त्यांची वडीलार्जित मिळकत असून ते सदर मिळकतीमध्ये मालकी हक्काने कब्जे वहिवाटीत असून त्या ठिकाणी वेगवेगळी पिके घेत आहेत. वाद मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्क संबंध नाही. असे असताना प्रतिवादी वाद मिळकतीच्या उत्तर बाजूने बांध फोडून अतिक्रमण करत आहेत. प्रतिवादींना समजावण्याचा प्रयत्न केला असता ते ऐकण्याच्या परिस्थितीत नाहीत. सदर वाद होत असल्याने वादी यांनी वाद मिळकतीची उप अधिक्षक भूमी अभिलेख कवठे महांकाळ कार्यालयाकडून मोजणी केली असता प्रतिवादी यांनी वाद मिळकतीवर ६आर इतके अतिक्रमण केल्याचे दिसून आले आहे. प्रतिवादी यांना सदर अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मागितला असता त्यांनी त्यास नकार दिला व बांध फोडून पिकाचे नुकसान करणार आहे, झाडे तोडणार आहे त्यांना कोणीही काही करू शकत नाही काय करायचे ते करा असे म्हणाले. वादीच्या पूढील कथनानुसार प्रतिवादी यांचे गावातील गुंड लोकांशी संबंध आहेत. त्यांनी बळाचा वापर करुन बांध फोडल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी हे दाव्यास व अर्जास म्हणणे दाखल करुन वादीची अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीच्या कथनानुसार, त्यांनी गट नं. ९१३ मध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नव्हते अथवा नाही. वादीने दाव्यात नमुद केलेली मोजणी कधी केली, कोणी केली हे नमुद केलेले नाही. वादीने दाव्यासोबत सादर केलेल्या हातनकाशा बिनास्केलचा असून तो चुकीचा आहे. वादीस दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडलेले नाही.

५. प्रतिवादीच्या पूढील कथनानुसार, प्रतिवादींचा गट नं. ९१२/११ हा गट बांधणीच्या वेळी मुळ सर्व्हे नं. ७९/२, ८०/२, ८२/२ व ८३/२ यांचा मिळून एकच गट नंबर ९१२/१ ते ९१२/१८ असे चालू गट नंबर तयार झालेले आहेत. सदर गट बांधणी वेळी मुळ सरवेहे नंबर ८३/२ चे क्षेत्र ७ हे. ६० आर. म्हणजेच १८ एकर ३१ गुंठे अशी नोंद असताना गट बांधणीवेळी ९(३) व ९ (४) च्या उताऱ्यावरती चुकीने ७ हे. ७ आर. अशी नोंद झाली असून त्यामध्ये ० हे ५३ आर क्षेत्राची तफावत आहे. सदर चुक दुरुस्त होवून मिळणेकरीता प्रतिवादी यांनी उपसंचालक भुमी अभिलेख पुणे यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे. उप अधिक्षक भुमी अभिलेख यांनी केलेली मोजणी ही मुळ अभिलेखावरुन केली जात असल्याने मोजणी देखील चुकीची झालेली आहे. वादींना सदर बाबींचे ज्ञान असताना देखील त्यांनी तांत्रीक चुकीचा गैरफायदा घेवून प्रतिवादींची मिळकत गिळंकृत करण्यासाठी प्रस्तूतचा दावा व अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

६. वादीतर्फे विधिज्ञ व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

त्यांनी त्यांच्या अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. त्याचा सारासार विचार करुन या कामी मी खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यानुसार त्यांचे निष्कर्ष व कारणमीमांसा पुढे दिली आहे.

| **अ.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | वादी आपली बाजु प्रथम दर्शनी सिध्द करतो काय? | नकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा.**

**मुददा क्र. १ बाबत**

**७.** वादींतर्फे निशाणी क्र. ४ यादीसोबत एकुण ६ कागदपत्रे, नि. १२ च्या यादीसोबत एकुण ३ कागदपत्रे, नि. १४ च्या यादीसोबत एकूण ५ कागदपत्रे दाखल केली आहेत. सदर कागदपत्रांची आवश्यकता भासल्यास योग्य ठिकाणी ती विचारात घेण्यात येतील. प्रतिवादी यांनी नि. २७ वर १ कागदपत्र दाखल केले आहे.

८. प्रस्तुत अर्जातील वादीचे मुख्य कथन हे प्रतिवादीने त्याच्या गट क्र ९१३ वर केलेले ०६ आर अतिक्रमण हे आहे. वादीने सदर अतिक्रमण दर्शविण्यासाठी मो.र.क्र. तातडी/ हद्द कायम ३५८०/२०२२ दि. २३.११.२०२२ चा मुख्य आधार घेतलेला आहे. सदर आलेखाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसते की, सदर मोजणीसाठी वादी लक्ष्मण ज्ञानू जाधव यांनी गट नं. ९१३ ची हद्द कायम करण्यासाठी दिलेल्या अर्जावरुन सदर मोजणी झालेली होती. सदर मोजणी करते वेळी लगत खातेदार शिवाजी जाधव व तानाजी जाधव म्हणजेच प्रतिवादी देखील हजर असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

९. परंतु सदर मोजणी ही गट नं. ९१३ मधील क्षेत्राची हद्द निश्चीतसाठी असुन त्यानुसार केवळ वादीच्या गट नं. ९१३ मधील क्षेत्राची हद्द निश्चीत केले असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादीच्या मालकीचा गट नंबर ९१२/११ आहे. परंतू सदर मोजणीवेळी प्रतिवादीच्या गट नं. ९१२/११ ची मोजणी झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही अथवा वादीचे तसे कथन देखील नाही. अतिक्रमणाचा निष्कर्ष नोंदवण्यासाठी दोन्ही बाजुंच्या जमिनीची हद्द निश्चीत होणे आवश्यक असते. परंतु उपलब्ध पुराव्यावरुन प्रथमदर्शनी तशी परिस्थीती असल्याचे दिसुन येत नाही. तसेच कायदयातील तत्वानुसार मोजणीदार हे अतिक्रमणाची बाब दर्शवण्यासाठी तज्ञ व्यक्ती असुन प्रतिवादींचे, वादीचे ०६ आर क्षेत्रावर अतिक्रमण असलेबाबतचा निष्कर्ष उपलब्ध आलेखावर नोंदवल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे, वादीचे अर्जातील कथित ०६ आर

अतिक्रमणाच्या कथनास प्रथमदर्शनी पुष्टी मिळत नाही.

**१०.** वादीने त्याच्या अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ साक्षीदार प्रकाश पंडीत पाटील रा. इरळी याचे शपथपत्र तसेच झाडे व बांधांचे छायाचित्रे व सदर छायाचित्रकार यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. परंतू वादीने मुख्य आधार घेतलेल्या दस्तातून प्रथमदर्शनी अतिक्रमणाचा स्पष्ट निष्कर्ष निघत नसल्याने सदर शपथपत्र व छायाचित्रे यांच्या आधारावर अतिक्रमणाबाबतचा प्रथम दर्शनी निष्कर्ष नोंदवणे उचित ठरत नाही. वादीने, जरी प्रतिवादीविरुध्द फौजदारी तक्रार दिलेली असली, तरी केवळ सदर तक्रार दिली म्हणजे प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही.

**११.** प्रतिवादींनी एकत्रीकरणामध्ये क्षेत्रामध्ये तफावत झाली असल्यामुळे त्याबाबत सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागितली असल्याचे कथन केले आहे. जरी प्रतिवादीने त्यासंदर्भातील कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली नसली, तरीही वादीने स्वतः पुरावे सादर करुन कथित अतिक्रमणाची बाब प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक होते, परंतु वर चर्चा केल्याप्रमाणे सदर बाब उपलब्ध पुराव्यावरुन प्रथमदर्शनी सिध्द होत नाही.

**१२.** अभिलेखावरील एकंदर पुरावा सकृतदर्शनी विचारात घेता, केवळ वादीच्या क्षेत्राच्या हद्दनिश्चीतीच्या मोजणीवरुन, तसेच तज्ञ मोजणीदार व्यक्तीच्या अतिक्रमणाबाबतचा स्पष्ट अहवाल उपलब्ध नसताना, केवळ एका बाजुच्या हद्द

निश्चीतीच्या नकाशावरुन न्यायालयास स्वतःहून अतिक्रमणाचा अनुमान या टप्प्यावर काढता येणार नाही. सदरची बाब दोन्ही बाजुंच्या पुराव्यानंतरच स्पष्ट होउ शकणार आहे. सबब वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत नाही. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत..</u>**

**१३.** वर चर्चा केल्याप्रमाणे वादी प्रथमदर्शनी केस शाबीत करण्यास अपयशी ठरल्यामुळे सोयीचा समतोल व कधीही न भरुन येणारे नुकसान वादीच्या हक्कामध्ये नाहीत. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे या टप्प्यावर नुकसान होईल असे दर्शवणारा पुरावा प्रथमदर्शनी सादर केलेला नाही. याउलट अतिक्रमण पुराव्याअंती सिध्द झाल्यास वादीला योग्य तो दिलासा मिळणार आहे. अर्ज मंजूर केल्यास स्पष्ट पुराव्याशिवाय प्रतिवादीवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ व ३ नकारार्थी स्वरुपात उत्तरीत करीत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत :</u>**

**१४.** उपरोक्त चर्चीलेखावरुन सकृतदर्शन परिस्थिती, अनुकुलतेचा कल आणि अपरमित नुकसान या तिहेरी चाचणीच्या आवश्यक घटकांची परिपुर्ती वादीने सिध्द केलेले नाही. परिणामी अर्ज निशाणी ०५ नामंजूर करणे न्यायोचित ठरेल. प्रकरणातील परिस्थती विचारात घेता, अर्जाचा खर्च ज्याचा–त्याने सोसणे उचित ठरेल. त्यानुसार खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च ज्याचा – त्याने सोसावा.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.07.17 17:41:13 +0530

दिनांक – १७.०७.२०२६
ठिकाण: कवठेमहांकाळ

**( एम.ए.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कवठेमहांकाळ

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 17.07.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 17.07.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 17.07.2026 |